# जाहिरात

## महाराष्ट्र शासन वनविभाग

## संचालक, बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली (स्थित- चंद्रपूर)

## (आर्थिक वर्ष २०१७-१८ )

शासन निर्णय क्रमांक एफडीएस – २०१४/प्र.क्र.६४/भाग-२/फ-२, दिनांक ४ डिसेंबर, २०१४ अन्वये चिचपल्ली, ता.जि.चंद्रपूर येथे बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली (स्थित- चंद्रपूर) या संस्थेव्दारे स्वयंरोजगार निर्मितीसाठी ९० दिवसाचे Bamboo Construction प्रशिक्षण देणेकरीता प्रशिक्षणार्थीची निवड करावयाची आहे. त्याकरीता प्रशिक्षणार्थींना १००% शासकिय अनुदानातुन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

उमेदवारांची निवड या कार्यालयाचे निकषानुसार व विहीत कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल. निवड प्रक्रियेचे अधिकार संचालक, बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचेकडे राखीव ठेवण्यात आले आहे. संस्थेने घालुन दिलेल्या नियमांचे व अटीचे पालन करणे उमेदवारास बंधनकारक राहील. करीता खालील निकष व पात्रता असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहीवासी असावा.
२. बांबु पासुन कलात्मक वस्तु बनविण्याची प्राथमिक माहीती व अनुभव असलेले तसेच बुरड कारागीरांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
३. उमेदवार हा १८ ते ३८ वयोगटातील असावा.
४. उमेदवार हा कमीत कमी दहावी पास व त्यापेक्षा अधिक उच्च शिक्षीत असावा.
५. Diploma in Civil Candidates ना प्राधान्य देण्यात येईल.

तरी इच्छुक उमेदवारांनी **दिनांक ०५/०२/२०१८** पर्यत आपले अर्ज संपूर्ण वैयक्तीक तपशिल व आवश्यक दस्ताऐवजांच्या छायांकित प्रतीसह खालील पत्त्यावर स्वत: किंवा डाकेने पाठवावे. अर्जाचा नमुना या कार्यालयाचे www.brtc.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच स्थानिक व जवळपासच्या उमेदवारांना प्रत्यक्षरित्या या कार्यालयातुन कार्यालयीन वेळेत अर्जाचा नमुना प्राप्त करता येईल.

पत्रव्यवहाराचा पत्ता:-
संचालक, बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली
(स्थित-चंद्रपूर) जिल्हा क्रिडा संकुलनाजवळ,
आकाशवाणी केंद्राचे मागे, सिव्हील लाईन,चंद्रपूर

स्वा/-
संचालक
बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली
(स्थित-चंद्रपूर)